जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2019
लोकसत्ता

# नॅक पुनर्मूल्यांकन कार्यशाळा

**कराड :** महाविद्यालयांच्या प्रगतीसाठी नॅक व्यवस्था असून, त्या माध्यमातून महाविद्यालयाचे परीक्षण केले जाते. महाविद्यालयाचा दर्जा ठरवला जातो. तरी नॅकच्या सादरीकरणासाठी सर्वांची सकारात्मक भूमिका असणे गरजेचे असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. सातारा येथील लाल बहाद्दूर शास्त्री महाविद्यालयामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय नॅक पुनर्मूल्यांकन कार्यशाळेत ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ म्हणाले, की लाल बहाद्दूर शास्त्री महाविद्यालयाने नव्या नियमानुसार नॅकला सामोरे जात ए ग्रेड मानांकन मिळवण्याचे यश हे संघटित कार्य आहे. सर्वांनी मनापासून नॅक मूल्यांकनासाठी योगदान दिले आहे. सर्व सेवकवर्गाने एकजुटीने दर्शन घडवले आहे. कार्यशाळेत डॉ. जगन्नाथ पाटील, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. आर. के. कामत, डॉ. प्रकाश थोरात, प्रा. डॉ. एस. के. माने, अमित कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

लोकमत

### वसंत भोसले : शिवाजी विद्यापीठातील ‘पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेस’चा प्रारंभ

# माहितीचा योग्य वापर करून प्रश्न, समस्या सोडवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इंटरनेट, सोशल मीडियाच्या वापरामुळे विविधांगी माहिती वेगाने उपलब्ध होत आहे. त्या माहितीचा योग्य वापर करून सर्वसामान्यांचे प्रश्न, समस्या, अडचणी सोडविण्याचे काम होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ‘लोकमत’चे संपादक वसंत भोसले यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे आयोजित दोनदिवसीय ‘राज्यस्तरीय पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेस २०१९’च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार सुभाष देसाई होते. ‘फेक न्यूज : मिस इन्फर्मेशन अँन्ड डिस इन्फर्मेशन’ या संकल्पनेवर विद्यार्थी काँग्रेस आयोजित केली आहे. संपादक वसंत भोसले म्हणाले, माध्यम क्षेत्रात सध्या काहीसे गोंधळाचे, अविश्वासाचे वातावरण आहे. अशा स्थितीत फेक न्यूज, चुकीच्या माहितीचे प्रसारण रोखण्याबाबत प्रबोधन करण्यासाठी ‘विद्यार्थी काँग्रेस’ आयोजनाचा उपक्रम उल्लेखनीय आहे. पूर्वी बातम्यांसाठी माहिती संकलित करण्याकरिता फारशी साधने उपलब्ध नव्हती; त्यामुळे एखादी माहिती मिळविण्यासाठी खूप यातायात करावी लागत होती. मात्र, आता इंटरनेट, सोशल मीडिया, स्मार्टफोन, आदींमुळे कोणतीही माहिती कुठेही उपलब्ध होते. या तंत्रज्ञानाची ही एक चांगली बाजू आहे. मात्र, दुसरीकडे या तंत्रज्ञानाचा गैरवापर करून बनावट बातम्या, चुकीची माहिती प्रसारित करण्याचे प्रकारही वाढले आहेत. ते टाळण्यासाठी आपल्याला उपलब्ध झालेल्या माहितीची सत्यता तपासून पाहावी. बदलत्या तंत्रज्ञानामुळे मोठ्या प्रमाणात आणि सहजपणे उपलब्ध होत असलेल्या माहितीचा योग्य पद्धतीने वापर करून सर्वसामान्यांचे प्रश्न, समस्या सोडविण्याचे काम माध्यमे आणि पत्रकारांकडून व्हावे.



**शिवाजी विद्यापीठात मंगळवारी पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे आयोजित ‘राज्यस्तरीय पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेस २०१९’चे उद्घाटन ‘लोकमत’चे संपादक वसंत भोसले यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून झाले. यावेळी नीशा पवार, राजेंद्र पारिजात, प्रसाद प्रभू, सुभाष देसाई उपस्थित होते.**

## विशेष कक्षाचे उद्घाटन

मोबाईलचा गैरवापर टाळण्याबाबत प्रबोधन करणाऱ्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या विशेष कक्षाचे उद्घाटन या कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी आनंदवन व्यसनमुक्ती केंद्राचे अजय दुधाणे, आर. जे. शीतल माने यांनी मार्गदर्शन केले.

ज्येष्ठ पत्रकार सुभाष देसाई म्हणाले, पत्रकारिता हे क्षणाक्षणाला नवे आव्हान निर्माण करणारे क्षेत्र आहे. पत्रकारितेचे शिक्षण, प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपण पत्रकार कशासाठी होणार, याचा आधी विचार करावा. आत्मपरीक्षण आणि मूल्ये निश्चित करावीत. मूल्ये निश्चित नसतील, तर फेक न्यूज निर्माण करणाऱ्यांचे प्रमाण वाढतच राहील.

या ‘विद्यार्थी काँग्रेस’चे उद्घाटन प्रमुख उपस्थितांच्या हस्ते रोपाला पाणी घालून झाले. पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त तयार केलेल्या बोधचिन्हाचे अनावरण संपादक वसंत भोसले यांच्या हस्ते झाले. यावेळी इंटरनेट तज्ज्ञ डॉ. राजेंद्र पारिजात, ज्येष्ठ पत्रकार प्रसाद प्रभू प्रमुख उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. नीशा पवार यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. या विद्यार्थी काँग्रेसमध्ये कोल्हापूर, सांगली, सोलापूर आणि मुंबईतील पत्रकारितेचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

30 JAN 2019
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# खातरजमा करणे हाच फेक न्यूजवर उपाय

## पत्रकार प्रसाद प्रभू यांचे प्रतिपादन : विद्यापीठात 'फेक न्यूज' विषयावर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

बदनामी करण्याच्या हेतूनेच जाणीवपूर्वक फेक न्यूज पसरविली जाते, यामध्ये राजकीय अकांक्षा असते. संवेदनशील विषयाविषयी समाजमाध्यमातून आलेली माहिती वापरण्यापुर्वी पत्रकारांनी वस्तूस्थिती समजून घ्यावी. न्यूजच्या बाबतीत पत्रकारांनी सजगता बाळगली पाहिजे, असे प्रतिपादन बेळगाव 'तरुण भारत'चे पत्रकार प्रसाद प्रभू यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता आणि जनसंवाद विभागाच्यावतीने आयोजित 'फेक न्यूज : मिसइन्फर्मेशन ॲन्ड डिसइन्फर्मेशन' या कार्यशाळेत 'फेक न्यूज' विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा पवार होत्या. यावेळी डॉ. अजय दुधाणे यांच्या हस्ते 'इंटरनेट व्यसनमुक्ती केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.



कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना बेळगाव 'तरुण भारत'चे पत्रकार प्रसाद प्रभू. सोबत डावीकडून डॉ. शिवाजी जाधव, विभागप्रमुख डॉ. निशा पवार.

प्रभू म्हणाले, एखाद्या फेक न्यूजमुळे राजकीय व्देष, एखाद्याची बदनामी होते, तसेच वातावरण कलुषित होत आहे. त्यामुळे पत्रकारांनी आपल्याकडे आलेल्या माहितीची सत्यता तपासून, त्याची खातरजमा करूनच बातमी दिली पाहिजे. सोशल मीडियाचा सध्या प्रभाव वाढत असल्याने फेक न्यूज पसरविण्याचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे वाढत्या स्पर्धेच्या युगात पत्रकारांनी विकासात्मक बातम्या दिल्या पाहिजेत.

दुधाणे म्हणाले, मोबाईल तरुणांसाठी व्यसन बनले असून अनेक तरुण इंटरनेटच्या आहारी गेले आहेत. मोबाईलचे शरीरावरही दुष्परिणाम होत आहेत. त्यामुळे विद्यापीठातील या केंद्राचा तरुणांना निश्चितपणे उपयोग होईल.

यावेळी डॉ. सुभाष देसाई, डॉ. राजेंद्र पारिजात, डॉ. सुमेधा साळुंखे, प्रा. आनंदा पांढरबळे आदी उपस्थित होते.

### शोधप्रबंधाचे सादरीकरण

राज्यस्तरीय पत्रकारिता विद्यार्थी कॉंग्रेस मध्ये पहिल्या दिवशी मुंबई, पुणे तसेच कोल्हापुरातील पत्रकारितेचे विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी शोधनिबंध सादर केले. शिवाजी विद्यापीठातील डॉ. शिवाजी जाधव यांनी 'फेक न्यूज आणि हिंसाचार' या विषयावर तर पुणे एमआटीच्या डॉ. मयुरा जाधव यांनी 'माहिती आणि बातमीतील फरक', ज्येष्ठ पत्रकार धनंजय बिजले यांनी. 'फेक व्हिडिओ आणि माध्यमांनी केलेली पडताळणी', मुंबईच्या तन्मयी सवदी यांनी बनावट बातम्या व चुकीची माहिती तर दिग्विजय कुंभार यांनी समाजमाध्यमे आणि अफवा, आणि सोलापूरच्या अरविंद बगळे यांनी माध्यमांचे डिजिटल रुपांतरण आणि बनावट बातम्यांचा उदय या विषयावर संशोधन पेपर सादर केले.

पुढारी

# ‘फेक न्यूज’मुळे समाजाचे मोठे नुकसान

## शिवाजी विद्यापीठात पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेसचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

फेक न्यूज म्हणजे तंत्रज्ञानाचा गैरवापर आहे. जाणीवपूर्वक कुभांड रचून केलेला हा प्रकार आहे. त्यामुळे हा गैरवापर रोखण्यासाठी सर्वांनीच समन्वयाने प्रयत्न करावा. कारण फेक न्यूज ही विकृती असून, त्यामुळे समाजाचे मोठे नुकसान होऊ शकते, असा सूर विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मंगळवारी येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने आयोजित या दोन दिवसीय राज्यस्तरीय ‘पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेस- २०१९’चे उद्घाटन दैनिक लोकमतचे संपादक वसंत भोसले यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या निलांबरी हॉल येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुभाष देसाई होते. ‘फेक न्यूज : मिस इन्फर्मेशन अँड डिसइन्फर्मेशन’ या संकल्पनेवर हा दोन दिवसीय कार्यक्रम आहे.

भोसले म्हणाले, तंत्रज्ञानातील बदलामुळे अवतीभवती खूप माहिती उपलब्ध आहे. या माहितीचा वापर सकारात्मक पद्धतीने केला पाहिजे. फेक न्यूजमुळे लोकशाही मूल्यांवर आघात होत आहेत.

डॉ. राजेंद्र पारिजात म्हणाले, तंत्रज्ञानातून माहितीचे स्वातंत्र्य मिळाले. आशयाचेही स्वातंत्र्य मिळाले; परंतु फेक न्यूजसारखी विकृती वाढली आहे. डॉ. देसाई म्हणाले, माध्यमांसमोर आव्हाने वाढत आहेत. रोबोटिक्स तंत्रज्ञान हे मोठे आव्हान आहे. यावेळी विविध मान्यवरांनी मते मांडली.

डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी स्वागत केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकारांसह पुण्यातील एमआटीच्या पत्रकारिता विभागाच्या सहायक प्राध्यापक डॉ. मयुरा जाधव, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या सहायक प्राध्यापक तेजस्विनी कांबळे, डॉ. समेधा साळुंखे, अनुराधा इनामदार आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. दोन दिवसीय विद्यार्थी काँग्रेसचा बुधवारी समारोप होणार आहे.

लोकमत

पी. एस. पाटील : न्यू कॉलेजमधील 'न्यू होरायझन' आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे उद्घाटन

# विद्यार्थ्यांनी नवनिर्मितीबाबत आग्रही असावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विद्यार्थ्यांनी नेहमी स्वत:ला तत्पर ठेवावे. अद्ययावत ठेवून, नवनिर्मितीबाबत आग्रही असावे, असे आवाहन प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

येथील न्यू कॉलेजमधील 'न्यू होरायझन' या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे विनय पाटील होते. प्रा. पी. एस. पाटील म्हणाले, संशोधनासाठी जिद्द, चिकाटी, कष्ट हे गुण असले पाहिजे. या गुणांच्या आधारे कोणत्याही क्षेत्रात करिअर करणे सोपे जाते. प्रचलित परंपरेनुसार वाटचाल करण्याऐवजी नवीन विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे. त्यातून नवनिर्मिती करावी. विनय पाटील म्हणाले, बांधिलकी, आत्मविश्वास, संयम, एकाग्रता या गुणांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्यांना निश्चितपणे यश मिळेल. या कार्यक्रमात कॉम्प्युटर सायन्स विभागाचे प्रमुख डॉ. ए. ए. कलगोंडा यांनी प्रास्ताविक केले.

इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्रमुख डॉ. ए. एम. शेख यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सृष्टी निर्मळे, प्रथम गुळवणी यांनी सूत्रसंचालन केले. मृगनी भूतकर यांनी आभार मानले. या स्पर्धेत शोधनिबंध सादरीकरण, भित्तीपत्रके सादरीकरण, प्रोग्रॅमिंग स्किल टेस्ट या विभागात सुमारे ३५० विद्यार्थी सहभागी झाले.



कोल्हापुरातील न्यू कॉलेजमध्ये झालेल्या 'न्यू होरायझन' स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. पी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## स्पर्धेतील विजेते

स्पर्धेत हर्षवर्धन कुलकर्णी, सोहम कुलकर्णी, शिवानी टिपुगडे, श्वेता चौगुले (न्यू कॉलेज), अमीर सोलापुरे (व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, पेपर प्रेझेंटेशन). श्रुतिका कुंभार, श्रद्धा जाधव (न्यू कॉलेज), पायल गोसावी, नयन तोरस्कर (विवेकानंद कॉलेज), श्वेता चराटी (न्यू कॉलेज, पोस्टर प्रेझेंटेशन). सतेज कुलकर्णी, हर्षवर्धन कुलकर्णी, श्रुतिका सावंत, राजकुवर काळे, जयदीप चव्हाण, आशिष जाधव (न्यू कॉलेज, प्रोग्रॅमिंग स्किल टेस्ट).

Hello Kolhapur
Page No. 2 Jan 30, 2019
Powered by: erelego.com

पुढारी

# विद्यापीठाला आज रशियन टीमची भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने 'विथ लव फ्रॉम रशिया' हा सांस्कृतिक कार्यक्रम बुधवारी (दि. ३०) होणार आहे. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे सायंकाळी ५ वाजता कार्यक्रम असेल. या कार्यक्रमांतर्गत मिनिस्ट्री ऑफ फॉरेन अफेअर्स व रशियन फेडरेशन या शाळेतील शिक्षक चुबारोवा तत्याना, नतालिया बुरत्सेवा, पलीना बुर्दीना, इरीना बिस्पालवा यांच्या समवेत काही विद्यार्थी विदेशी भाषा विभागास भेट देणार आहेत. यावेळी विद्यार्थ्यांतर्फे पारंपरिक रशियन नृत्य सादर करण्यात येणार आहे. यावेळी रशियन टीम विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहे. विदेशी भाषांमध्ये उपलब्ध असणाऱ्या शिक्षण, रोजगार संधी व पर्यटन याबाबत माहिती दिली जाईल. कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. मेधा पानसरे यांनी केले आहे.